# गणबती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या..!




वर्ष - 6 । अंक - 151 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महाईन्यूज**

**शनिवारी अंक नाही...**

**महाईन्यूज** या डिजिटल इपेपरच्या कार्यालयास 9 सप्टेंबर रोजी **अनंत चतुर्दशीनिमित्त** सुटी असल्याने शनिवार दिनांक 10 सप्टेंबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

- कार्यकारी संपादक

सुटीच्या दिवशीही **महाईन्यूज**शी कनेक्ट राहण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.

https://mahaenews.com/

www.mahaenews.com | शुक्रवार । दिनांक 9 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



सरकारविरोधात जाणाऱ्यांवर छापे पडत आहेत, हे आता काही नवीन राहिले नाही. इतर पक्षांतून जे लोक भाजपमध्ये जातात त्यांच्या चौकशा थांबतात, असे भाजपचेच लोक सांगत आहेत. महाराष्ट्रात ईडीचा धाक दाखवून, दडपशाही करून सत्ता ओरबाडून घेतली. परंतु गेल्या अडीच महिन्यांत सर्वसमान्य जनतेला दिलासा मिळेल, असा एकही निर्णय या सरकारने घेतलेला नाही.

**- सुप्रिया सुळे, खासदार बारामती**

सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून त्यांना शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ सुलभरीत्या मिळावा यासाठी सामान्यांच्या समस्या आणि शासकीय कार्यपद्धती यांची सांगड घालत सुशासन नियमावली करावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी येथे दिले. कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण आदिवासी विकास, रोजगारनिर्मिती या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देऊन अन्य राज्यांना आदर्श ठरेल, अशी नियमावली तयार करावी.

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**



# निवडणुका कधी होतील माहिती नाही!

## विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये प्रतिपादन

पिंपरी ।। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन मी गणेश मंडळांना भेटी देत नाही. आजही कोणालाही माहिती नाही की निवडणुका कधी होतील. त्यामुळे मी कुठल्याही गोष्टी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून करत नसल्याचे विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सांगितले.**





पिंपरी - चिंचवड शहरातील विविध गणेश मंडळांना अजित पवार यांनी (गुरुवारी) भेटी दिल्या. त्यावेळी काळेवाडी येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राष्ट्रवादी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे - पाटील, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, कोरोना महामारीच्या दोन वर्षाच्या काळात सार्वजनिक उत्सवात कोणाला भाग घेता आला नाही. साधेपणाने सण साजरे करावे लागले. यंदा मात्र कोरोना रुग्णांची संख्या कमी झाल्याने नागरिकांमध्ये उत्साह आहे. पिंपरी - चिंचवडमधील गणेश मंडळांना भेटी दिल्या. त्यातून कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी होतात. मला पण समाधान मिळते. महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन दौरा ठरविलेला नाही. मी कुठल्याही गोष्टी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून करत नाही. हा माझा स्वभाव नाही. पिंपरी - चिंचवडने अनेक वर्ष मला अतोनात प्रेम दिले. माझ्या राजकीय जीवनाची सुरुवातच या भागातून झाली. तेव्हापासून या सगळ्या जनतेशी माझा संबंध आहे. मी कधीही निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन असले कार्यक्रम करत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कोरोना महामारीच्या दोन वर्षाच्या काळात सार्वजनिक उत्सवात कोणाला भाग घेता आला नाही. साधेपणाने सण साजरे करावे लागले. यंदा मात्र कोरोना रुग्णांची संख्या कमी झाल्याने नागरिकांमध्ये उत्साह आहे. पिंपरी - चिंचवडने अनेक वर्ष मला अतोनात प्रेम दिले. माझ्या राजकीय जीवनाची सुरुवातच या भागातून झाली. तेव्हापासून या सगळ्या जनतेशी माझा संबंध आहे. मी कधीही निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन असले कार्यक्रम करत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. तर मी बाप्पाला काहीही साकडे घातले नाही. ज्यावेळेस आपली एखाद्या ठिकाणी श्रद्धा, भक्ती, आपण तिथे नतमस्तक होणासाठी जातो. त्यावेळेस प्रत्येकाने तिथे जाऊन साकडेच घातले पाहिजे असे नाही.**

**- अजित पवार, विरोधी पक्ष नेते**

## शेतकऱ्यांच्या पाठिशी सरकारने उभे रहावे-अजित पवार

पिंपरी - यंदा पाऊस समाधानकारक पडला आहे. पण, पावसाने शेतकरी वर्गाचे नुकसानही केले आहे.  कोकणसह काही भागात जोराचा पाऊस झाला. नैसर्गिक संकटामुळे अडचणीत आलेल्यांना उभे करायचे, सावरायचे असते. त्यांना मदत करायची असते. राज्य सरकारने शेतक-यांच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे, असे मत राज्याचे विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी पिंपरी येथे व्यक्त केले. पिंपरी - चिंचवड शहरातील विविध गणेश मंडळांना अजित पवार यांनी (गुरुवारी) भेटी दिल्या. त्यावेळी काळेवाडी येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

### दोषींना कठोर शिक्षा करा

मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी याकुब मेमनच्या कबरीचे कोविड काळात सुशोभीकरण करण्यात आल्याच्या मुद्दयावर भाष्य करताना अजितदादा म्हणाले, कुठल्याही देशद्रोही व्यक्तीचे उदात्तीकरण होता कामा नये. कोणाचेही सरकार असले तरी कुठल्याही सरकारच्या काळात या गोष्टी व्हाव्यात असे कधीच कोणाला वाटणार नाही. आता सध्या महागाई आणि बेरोजगारी यावरील लोकांचे लक्ष विचलित करण्याकरिता असले काही तरी मुद्दे काढायचे. आता केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. या कृत्यामागे कोण आहे, कोणी हे सगळे केले ते शोधून काढा आणि दोषींना कठोर शासन करा.

# खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु !

## 4 दिवस धरणांच्या परिसरासह शहरातही जोरदार पाऊस पडण्याची शक्यता

। पुणे। महाईन्यूज ।

खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या परिसरात पाऊस परतला आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत रात्री उशीराने पाणी सोडण्यास सुरूवात करण्यात आली. हवामान विभागाने जिल्ह्याला मध्यम ते मुसळधार पावसाचा पिवळा इशारा दिला आहे. त्यानुसार पुढील चार दिवस धरणांच्या परिसरासह शहरातही जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

शहराला टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. सध्या चारही धरणांत मिळून एकूण २९.०८ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ९९.७७ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. चारही धरणांत पावसाला सुरूवात झाल्याने खडकवासला धरण



**सध्या चारही धरणांत मिळून एकूण २९.०८ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ९९.७७ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. चारही धरणांत पावसाला सुरूवात झाल्याने खडकवासला धरण रात्री १०० टक्के भरले. त्यामुळे रात्री ११ वाजता ४२८ क्युसेक वेगाने धरणातून मुठा नदीत पाणी सोडण्यात आले. पावसाचे प्रमाण पाहून धरणातून सुरू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी-जास्त केला जाणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.**

रात्री १०० टक्के भरले. त्यामुळे रात्री ११ वाजता ४२८ क्युसेक वेगाने धरणातून मुठा नदीत पाणी सोडण्यात आले. पावसाचे प्रमाण पाहून धरणातून सुरू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी-जास्त केला जाणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

# ताप, सर्दी, खोकला आणि श्वसन विकारांचा धोका

## मिरवणुकीत खबरदारी आवश्यकच

। पुणे। महाईन्यूज ।

करोना महासाथीमुळे पडलेल्या दोन वर्षांच्या खंडानंतर यंदा सार्वजनिक गणेशोत्सव साजरा झाला. त्याची समाप्ती आज अनंत चतुर्दशीनिमित्त निघणाऱ्या विसर्जन मिरवणुकांनी होत आहे. मात्र, विसर्जन मिरवणुकीच्या उत्साहात आणि जल्लोषात सहभागी होताना ताप, सर्दी, खोकला आणि श्वसन विकारांना निमंत्रण देऊ नका, त्यासाठी आवर्जून मुखपट्टीचा वापर करा, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.

शहरात सध्या डेंग्यू, स्वाइन फ्लू, विषाणूजन्य आजारांच्या रुग्णांचे प्रमाण लक्षणीय आहे. गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकांनंतर दरवर्षीच संसर्गजन्य आजार तसेच बाहेर किंवा उघड्यावरचे खाद्य पदार्थ खाण्यामुळे पोटाचे विकार यांचे रुग्ण वाढलेले दिसून येतात. यंदा सातत्याने पडणारा पाऊस हा विषाणूजन्य आजाराला निमंत्रण देण्यास प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहे. तशातच करोनाचे रुग्ण आढळण्याचे प्रमाणही पुणे शहर, जिल्ह्यासह राज्यातही कायम



आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विसर्जन मिरवणुकीच्या उत्साहात सहभाग घेताना गाफील न राहण्याचे आवाहन डॉक्टर करत आहेत.

जनरल फिजिशियन डॉ. अविनाश भोंडवे म्हणाले,की गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांचे एकमेकांमध्ये मिसळणे, भेटीगाठी आणि एकत्र येणे याचे प्रमाण वाढले आहे. विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेताना गर्दी टाळणे ही खरे तर अशक्य गोष्ट आहे. मात्र, शक्य तेवढे गर्दीपासून अंतर राखणे, मुखपट्टीचा वापर करणे, हँड सॅनिटायजर वापरणे या गोष्टी सहज करण्यासारख्या आहेत. बाहेरचे पाणी पिऊ नये. उघड्यावरचे अन्नपदार्थ खाणे टाळावे, असेही डॉ. भोंडवे यांनी स्पष्ट केले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला तसेच रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, हृदयरोग अशा आजारांच्या रुग्णांनी बाहेर पडणे टाळावे असेही डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

# पुणे : विसर्जन मिरवणूक लवकर आटोपण्याचा पोलिसांचा प्रयत्न

## वैभवशाली परंपरा असलेली विसर्जन मिरवणूक लवकरात लवकर आटोपण्यासाठी पोलिसांकडून बंदोबस्ताची आखणी मिरवणूक

। पुणे । महाईन्यूज ।

वैभवशाली परंपरा असलेली विसर्जन मिरवणूक लवकरात लवकर आटोपण्यासाठी पोलिसांकडून बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. विसर्जन मिरवणुकीत खंड पडणे किंवा रेंगाळल्यास पोलिसांकडून मिरवणूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी गुरुवारी स्पष्ट केले. वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्यातील विसर्जन मिरवणूक करोना संसर्गामुळे काढण्यात आली नव्हती. दोन वर्षांच्या खंडानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी (९ सप्टेंबर) विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार असून, प्रथेप्रमाणे मंडईतील लोकमान्य टिळक पुतळ्यापासून मुख्य विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ



होणार आहे. विसर्जन मिरवणूक सोहळ्यातील बंदोबस्ताची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त गुप्ता बोलत होते. अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र डहाळे, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे, विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त आर. राजा या वेळी उपस्थित होते. विसर्जन मिरवणूक शांततेत; तसेच सुरळीत पार पाडण्यासाठी बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. गुरुवारी (८ सप्टेंबर) शहर तसेच उपनगरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणूक सोहळ्यासाठी चार अतिरिक्त पोलीस आयुक्त, १० उपायुक्त, २१ सहायक पोलीस आयुक्त, ५५ पोलीस निरीक्षक ,३७९ सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक तसेच चार हजार ५७९

### आवाजाच्या पातळीची मर्यादा ओलांडल्यास कारवाई

विसर्जन मिरवणुकीत रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनिवर्धक वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. उच्चक्षमतेचे ध्वनिवर्धक; तसेच आवाजाच्या पातळीची मर्यादा ओलांडल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त गुप्ता यांनी दिला.

### संशयास्पद वस्तू आढळल्यास तक्रार करा

विसर्जन मिरवणुकीचे पोलिसांकडून ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण करण्यात येणार आहे. विसर्जन मार्गावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. मिरवणुकीत संशयास्पद व्यक्ती किंवा बेवारस वस्तू आढळल्यास पोलीस नियंत्रण कक्षात (दूरध्वनी-११२) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मेट्रो पुलामुळे देखाव्यांची उंची मोजण्याचे काम

खंडुजीबाबा चौकातील मेट्रो पुलामुळे मिरवणुकीतील देखाव्यांची उंची १८ फुटांपेक्षा कमी असावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. गुरुवारी (८ सप्टेंबर) मध्यरात्रीपासून विसर्जन मिरवणुकीत मंडळाचे रथ विसर्जन मार्गावर दाखल होतात. देखाव्यांची उंची पोलिसांकडून मोजण्यात येणार आहे. त्यामुळे खंडुजीबाबा चौकातील मेट्रो पुलाच्या परिसरात गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र डहाळे यांनी नमूद केले.

पोलीस कर्मचारी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विसर्जन मिरवणूक सोहळा लवकरात लवकर आटोपण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणुकीत खंड पडल्यास किंवा रेंगाळल्यास त्वरीत मिरवणूक मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. शनिवारी (१० सप्टेंबर) सकाळपर्यंत विसर्जन मिरवणूक आटोपण्याच्या दृष्टीने पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहे, असे गुप्ता यांनी नमूद केले. विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी बंदोबस्ताची आखणी करण्यात आली. विसर्जन मिरवणूक लवकर आटोपण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, मिरवणुकीत कायदा-सुव्यवस्थेबाबतची परिस्थिती निर्माण झाल्यास पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार आहे.

# आज सुमारे 8 हजार पोलीस तैनात!

## शहरात प्रत्येक घाटावर एक फायरमन, अग्निशमन अधिकारी व 2 जीवरक्षक तैनात

पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विसर्जन मिरवणुकी दरम्यान पुणे शहरात पाच हजार पोलीस तैनात असणार आहेत. मानाच्या गणपती बरोबरच शहरातील किमान तीन हजार सार्वजनिक गणेश मंडळाचे विसर्जन होण्याचा अंदाज आहे. सुमारे 85 घाटांवर गणपतीचे विसर्जन करण्यात येणार आहे. पुणे शहरात गणपती विसर्जनाची मिरवणूका निघणार असल्यामुळे वाहतुकीमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत..**



पुण्यातील 17 रस्ते हे वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत.पुणे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने सांगितले की, शहरात 15 प्रमुख घाट आहेत.या प्रत्येक घाटावर एक फायरमन, अग्निशमन अधिकारी व 2 जीवरक्षक तैनात असतील. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये पिंपरी चिंचवड, चाकण, देहूरोड व तळेगाव दाभाडे ही शहरे तसेच हिंजवडी आयटी पार्क आणि इतर ग्रामीण परिसर यांचा समावेश होतो.गणेशोत्सव काळात एवढ्या मोठ्या क्षेत्राच्या बंदोबस्तासाठी आयुक्तालयामार्फत 50 पोलीस निरीक्षक, 150 सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक, 1207 पोलीस अमलदार, 254 होम गार्डस व 4 राज्य राखीव पोलिसांच्या प्लॅटून्स तैनात असतील. तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यामार्फत स्वयंसेवक व विशेष पोलीस अधिकारी यांची बंदोबस्तासाठी नियुक्ती करण्यात येईल. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागामार्फत गणेशोत्सव काळात वाहतूक नियमनासाठी 7 पोलीस निरीक्षक, 8 पोलीस उपनिरीक्षक/ सहाय्यक पोलीस निरीक्षक, 248 कर्मचारी व 30 होमगार्ड तैनात असतील.किरण गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले की उद्या पिंपरी चिंचवड शहरात 30 विसर्जन घाटांवरती गणपती विसर्जन होणार आहे. यातील 10 प्रमुख घाट आहेत. या 30 घाटांवरती एकूण 60 फायरमन तैनात असतील. त्यांच्याकडे लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग्स व लाईफ रोप्स असतील. प्रमुख 3 ते 4 घाटांवर कोणी बुडाल्यास त्यांना वाचवण्यासाठी सेफ्टी बोट असतील.फायरमन कडे वॉकी टॉकी सेट्स, मोबाईल फोन्स संपर्क करण्यासाठी असतील. डिजास्टर मानजमेंट फोर्स भोसरी, थेरगाव बोट क्लब व वन्य पशु पक्षी संरक्षण संस्था सांगवी या तीन संस्था 35 ते 40 जीवरक्षक (लाईफगार्ड्स) पुरवतील व ते घाटांवरती तैनात असतील. तसेच मनपा क्रीडा विभागाचे 15 क्रीडा शिक्षक देखील घटनावर मदत करण्यासाठी तैनात असतील. तसेच 10 प्रमुख घाटांवरती प्रत्येकी एक ॲम्ब्युलन्स असेल.

### दृष्टिक्षेपात बंदोबस्त

**पोलीस उपायुक्त 10**

- सहायक पोलीस आयुक्त २३ पोलीस निरीक्षक १३८
- सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक ६२५
- पोलीस कर्मचारी ७,७४२

### शहरात वाहतूक बदल

शहराच्या मध्य भागातील प्रमुख रस्ते तसेच उपरस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहेत. आपत्कालिन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहोचण्यासाठी त्वरित मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांना त्वरित वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणुकीत संशयित व्यक्ती किंवा बेवारस वस्तू आढळल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्षात किंवा बंदोबस्तावरील पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मिरवणुकीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

विसर्जन मिरवणुकीची सांगता होईपर्यंत शहर तसेच उपनगरात पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. राज्य राखीव पोलीस दलाचे (एसआरपीएफ), गृहरक्षक दलाचे जवान बंदोबस्तास राहणार आहेत. विसर्जन मार्गावरील दागिने, मोबाइल संच हिसकावणे तसेच छेडछाडीच्या घटना रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस गस्त घालणार आहेत. नागरिकांसाठी मदत केंद्र राहणार आहे. चौकाचौकात निरीक्षण मनोरे उभे करण्यात येणार आहेत. विसर्जन मिरवणुकीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे.

---

# गणेश विसर्जनासाठी चिंचवड येथील वाहतुकीत बदल

## 9 सप्टेंबर रोजी दुपारी तीन ते मध्यरात्री बारापर्यंत हा बदल राहणार

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।





वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त आनंद भोईटे यांनी याबबत आदेश दिले आहेत. चिंचवडमधील अहिंसा चौक ते चापेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी एसकेएफ चौकातून खंडोबा माळकडून मुंबई - पुणे महामार्गाने इच्छित स्थळी जावे. दळवीनगर ब्रिजकडून चापेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल.

अनंत चतुर्दशीदिवशी गणेश विसर्जनासाठी सार्वजनिक गणेश मंडळांच्या निघणाNया मिरवणुका आणि घरगुती बाप्पांच्या विसर्जनासाठी नागरिकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन चिंचवड परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. ९ सप्टेंबर रोजी दुपारी तीन ते मध्यरात्री बारापर्यंत हा बदल राहणार आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त आनंद भोईटे यांनी याबबत आदेश दिले आहेत. चिंचवडमधील अहिंसा चौक ते चापेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी एसकेएफ चौकातून खंडोबा माळकडून मुंबई - पुणे महामार्गाने इच्छित स्थळी जावे. दळवीनगर ब्रिजकडून चापेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी एसकेएफ चौकाकडून बिजलीनगर मार्गे जावे. वाल्हेकरवाडी टी जंक्शनकडून चापेकर चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी वाल्हेकरवाडी जुना जकात नाका येथून डावीकडे वळून जय शाळेपासून बिजलीनगर अथवा एसकेएफ मार्गे खंडोबा माळ येथून जावे.

लिंक रोड वरून चापेकर चौकातील पीएमटी बस स्टॉप येथून चापेकर चौकात जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. लिंक रोडने येणाNया वाहनचालकांनी डावीकडे वळून काळेवाडी मार्गे जावे. भोई आळी तसेच चिंचवड चौकी येथून चापेकर चौकात जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. ही वाहने केशवनगर मार्गे याची स्थळी जातील. चिंतामणी चौक वाल्हेकरवाडी रिव्हर व्ह्यू चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. या वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. ही वाहने रिव्हर व्ह्यू चौकाकडून वाल्हेकरवाडी मार्गे इच्छितस्थळी व अहिंसा चौक ते महावीर चौक किंवा एसकेएफ चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. अत्यावश्यक सेवेतील फायर ब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका या व्यतिरिक्त इतर वाहनांना हे नियम लागू असणार आहेत.

## संपादकीय »

# बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!

***दाटला जरी कंठ तरी निरोप देतो तुला हर्षाने माहित आहे देवा मला पुन्हा येणार तू वर्षाने गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...***

सर्वांच्या लाडक्या सुखकर्ता, विघ्नहर्ता बाप्पाच्या स्वागतासाठी १५ दिवसांपूर्वी संपूर्ण राज्यभर लगबग सुरू होती. घराघरात चैतन्य घेऊन आलेल्या या बाप्पाची आराधना करताना १० दिवस कधी संपले, कळलेच नाही. शहरात साजऱ्या झालेल्या या आनंदोत्सवाची आज, शुक्रवारी सांगता होणार आहे.

'गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला...' अशा घोषणा देत शहरातील मानाचे गणपती, विविध मंडळे आणि नागरिक आज बाप्पाला निरोप देणार आहेत. विसर्जन मिरवणुकीत, बाप्पाला निरोप देण्यासाठी पावसाच्या सरीही हजेरी लावणार असल्याचे वेधशाळेने सांगितले आहे. श्रावण महिना सुरू झाल्यावर गणेशोत्सवाची चाहूल लागली. घराघरात उत्सवाच्या तयारीची लगबग सुरू झाली. सजावटीच्या साहित्याच्या असंख्य प्रकारांनी बाजारपेठा सजल्या. गल्ली बोळात, गणराच्या रेखीव आणि लोभस मूर्तींचे स्टॉल आले आणि उत्सवाची उत्कंठा वाढत गेली. मंडळाचे कार्यकर्तेही उत्सवाच्या एक दिवस आधीपर्यंत धावपळ करीत होते.

कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांच्या खंडांमुळे या वर्षी जल्लोषात, नव्या उत्साहात गणेशभक्तांनी सुखकर्ता, विघ्नहर्ता, बाप्पाचे घराघरात, मंडळांमध्ये वाजतगाजत आमगन झाले. उत्सव अनुभवण्यासाठी विविध राज्यांतील, विदेशांतील पर्यटक पुण्यात आले होते. पाऊस असूनही भाविकांचा उत्साह कमी झाला नाही. रोज रात्री मध्यवर्ती परिसर, उपनगरांमध्ये भाविकांनी गणपतीची मूर्ती, देखावे बघण्यासाठी गर्दी केली होती. ठिकठिकाणी सुरू असलेले सांस्कृतिक कार्यक्रम, स्तोत्रपठण, गणेशवंदना, पारंपरिक वाद्यांच्या मिरवणुका, धार्मिक कार्यक्रमांमुळे १० दिवस शहरातील वातावरण गणेशमय झाले होते. बघता बघता गणेशोत्सवाचा शेवटचा दिवस आला आहे, बाप्पाला वाजतगाजत निरोप देण्यासाठी मंडळांनी जय्यत तयारी केली आहे. मानाच्या गणपती मंडळांसह सर्वच मंडळांच्या मिरवणुकांमध्ये पारंपरिक वाद्ये, विविध कला पथके सहभागी होणार आहेत. मुख्य मिरवणूक मार्गावर रांगोळीचे गालिचे काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता मानाचा गणपतींच्या मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. गणेशमूर्तीच्या विसर्जनासाठी शहरातील मुख्य घाटांसह उपनगरांत हौदांची व्यवस्था करण्यात आली आहे. नदीतील पाण्याची पातळी सध्या जास्त असल्याने भाविकांच्या सुरक्षेसाठी घाटावर २४ तास नेहमीपेक्षा जास्त जीवरक्षक तैनात राहणार आहेत. गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...

# 'कर्तव्य'पथावर निघालेल्या राहुल गांधीचा मार्ग राजपथ ठरतो का?






'सोचता हू अपने घर को देखकर, हो न हो ये है मेरा देखा हुवा...' 'खानदान' या चित्रपटातील गाण्याची ही ओळ काँग्रेसच्या आजच्या विदारक स्थितीचे नेमके वर्णन करते. खुद्द काँग्रेसजनांनाच प्रश्न पडावा की, 'हाच का तो आपला पक्ष? ज्याच्या नावाने दगड उभा केला तर तोही निवडून येईल, असे म्हटले जात होते.' मोडकळीला येऊनही कोणी डागडुजीचा गंभीरपणे विचार न केलेल्या आणि २०१९ च्या निवडणूकीनंतर बांबूचे टेकू लावून उभ्या ठेवलेल्या इमारतीसारखी अवस्था झालेल्या काँग्रेसचे 'घर फिरले' आणि आता हळूहळू ज्यांच्यावर भरवसा होता ते 'वासेही' फिरत आहेत. अशा इमारतीच्या पुनर्बांधणीचे अवघड काम करण्याचा कदाचित अखेरचा प्रयत्न म्हणून राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेकडे पाहावे लागेल. कन्याकुमारी ते श्रीनगर अशी बारा राज्यांमधून जाणार असलेली, ३५७० किलोमीटरची ही प्रदीर्घ यात्रा दीडशे दिवसांची असेल. अनेक चढ-उतार पाहून आता अगदीच उताराला लागलेल्या काँग्रेसची घसरण थांबवण्याची किमया ही यात्रा करु शकेल का, या प्रश्नाच्या उत्तरात देशाच्या भावी राजकीय वाटचालीचेही उत्तर असेल.

काँग्रेसला या अवस्थेपर्यंत आणण्याची शेकडो कारणे असतील, परंतु गेल्या पाच वर्षात त्या पक्षाची जी अवस्था झाली त्याचे खापर पूर्णपणे राहुल गांधीच्या असलेल्या किंवा नसलेल्या नेतृत्वावरच फोडले जात आहे. राहुलकडे नेतृत्व करण्याची क्षमता नाही, याबाबत कदाचित अनेकांचे एकमत होऊ शकेल, मात्र 'राहुल नको तर मग कोण?' या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नाही. काँग्रेसच्या बळावर सत्ता, संपत्ती, नेतृत्व सगळ्याचा मनसोक्त उपभोग घेऊन झाल्यावर आता पक्ष सोडून जात असलेले नेतेही केवळ स्वार्थापोटी जात आहेत, असेही म्हणता येत नाही. त्यांच्या शब्दाला किंमत मिळत नसल्यामुळे उचललेले ते टोकाचे पाऊलही असू शकेल. 'जी-२३' अशा नावाखाली पत्र लिहून राहुलच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारांची दखलही घेतली गेली नाही तेंव्हा काँग्रेस खरेच भाजपशी दोन हात करु इच्छिते की नाही, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे. गुलाम नबी आझाद यांना राज्यसभेतून निरोप देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोळ्यांत पाणी आले तेंव्हाच आझाद यांची पुढील वाट काय असेल, याचा अंदाज आला होता. त्यांच्याशी कोणी बोलण्याचा प्रयत्न केला होता का? कपील सिब्बल सारखा नेता बाहेर पडला, पृथ्वीराज चव्हाणही हळुहळू उघडपणे बोलू लागले आहेत. अशोक चव्हाणांनी त्यांच्याविषयीच्या अफवांचा लगोलग खुलासा केला असला तरी कुठेतरी आग असल्याशिवाय धूर निघत नाही, हे शहाणपण आपल्या भाषेनेच नोंदवून ठेवले आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असलेले पटोले यांनी बंगल्याचे सरकारी छत्र कायम राहावे, एवढे विरोधकांचे सौहार्द मिळवले आहे. राज्याराज्यात अशा पडझडीच्या खुणा दिसत असतानाही काही केले गेले नाही, त्यातूनच ही अवस्था आली आहे. केवळ भारत जोडो यात्रेतून या काँग्रेसच्या दुखण्यावर उपचार होणार नाहीत, दुखावलेले, दुरावलेले, निराश झालेले नेते-कार्यकर्ते या निमित्ताने जोडता आले तरच उपयोग आहे.

१९८० साली चंद्रशेखर यांनी पायी पदयात्रा केली होती, त्यानंतर निघाल्या त्या सर्व रथयात्रा होत्या, कार अथवा बसने प्रवास केलेल्या. राहुल गांधी १५० दिवसांत साडेतीन हजार किलोमिटर पायी फिरणार आहेत आणि रात्रीचा मुक्कामही ते हॉटेलात न करता कंटेनरमध्ये करणार आहेत. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यांचा या यात्रेत समावेश आहे कारण पुढील मार्च-एप्रिलमध्ये या राज्यांत निवडणूका आहेत आणि भाजपला थोडीफार टक्कर देण्याच्या स्थितीत तिथे पक्ष आहे. मध्य प्रदेश- राजस्थानात तर येत्या नोव्हेंबरातच निवडणुका आहेत. महाराष्ट्रातून जाताना नांदेड आणि जळगाव जामोद अशी मुक्कामाची दोन ठिकाणे आहेत. महाराष्ट्रात निवडणूक ठरल्याप्रमाणे होते की लोकसभा-विधानसभा एकत्र होतात, हे अद्याप स्पष्ट नाही, परंतु काँग्रेसची स्थिती 'रूग्ण गेलेला नाही, मात्र गंभीर आहे' अशा पद्धतीची आहे. गुजरातही यात्रेच्या मार्गापासून जवळच होते, तिथे जाणे राहुल यांनी टाळले आहे.

# दात नसलेला सिंह

**१९८६ साली युक्रेनमध्येच असलेल्या चेर्नोबिलच्या अणुभट्टीत भयावह अपघात झाला आणि तीस किलोमीटरच्या परिघातली सारी लोकवस्ती सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावी लागली.**

किरणोत्सर्जनापासून झालेली प्रत्यक्ष जीवितहानी जरी या अपघातात कमी होती तरीही माणसांवर, प्राण्यांवर, पानां- फुलांवर होणारे दुष्परिणाम फार भयावह असेच होते. या पहिल्या मोठ्या अपघातानंतर जपानच्या फुकुशिमा अणुभट्टी प्रकल्पाचा भूकंप आणि पाठोपाठच्या त्सुनामीच्या लाटेने झालेला २०११ सालचा भीषण अपघात मानवी इतिहासातला एक मोठाच अपघात गणला जातो.

युक्रेनमधील झोपोरिशिआ येथील अणुभट्टी प्रकल्पावर सध्या रशियाचा ताबा आहे. रशियापासून अणुभट्टी प्रकल्पाला भीषण धोका आहे, असा आरोप युक्रेन करत असताना आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संस्था (इंटरनॅशन अटोमिक एनर्जी एजन्सी) काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रशियाने युक्रेनवर २४ फेब्रुवारीच्या सकाळी हल्ला केल्यानंतर सुरुवातीचा रशियन सैन्याचा कारवाईचा वेग आणि जोश रशियन किर्तीला शोभणारा असाच होता. ह्या हल्ल्याचे पडसाद अख्ख्या जगात



लगेचच उमटू लागले. दरम्यान, मार्चच्या सुरुवातीलाच रशियन सैन्याने युक्रेनच्या दक्षिण भागातील झोपोरिशिआ अणुभट्टी प्रकल्पावर ताबा मिळवला. तेव्हापासून आजतागायत या अणुभट्टी प्रकल्पावर रशियन सैनिकांचा पूर्ण ताबा आहे; मात्र प्रकल्पातले सारे तंत्रज्ञ, कर्मचारी हे युक्रेनी आहेत. साधारणतः जुलै महिन्यात झोपोरिशिआच्या या अणुभट्टी प्रकल्पातून रशियन सैन्याला हुसकावून तो ताब्यात घेण्याचा युक्रेन सरकारचा प्रयत्न जोरात सुरु झाला. ते सारे प्रयत्न रशियन सैनिकांनी अद्याप तरी हाणून पाडलेत. पुढे ऑगस्ट महिन्यात या प्रकल्पास वीज पुरविणाऱ्या एका ग्रीडमध्ये समस्या उदभवली आणि जगभर रशियापासून या प्रकल्पाला भीषण धोका आहे, तोफा आणि रॉकेट्सच्या सततच्या माऱ्याने रशियन सैन्य हा युरोपातला सर्वात मोठा अणुभट्टी प्रकल्प नष्ट करून आण्विक संहार सुरु करू इच्छित आहे, असे वारंवार आरोप युक्रेनने सुरु केले. लगेचच अमेरिका आणि इंग्लंडने या आरोपांची री ओढली आणि आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संस्थेकडून या प्रकल्पाचे निरीक्षण व्हावे, अशी मागणी पुढे आली. सुदैवाने रशियन अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी या त्रयस्थांकडून होणाऱ्या निरीक्षणाला विरोध केला नाही. मात्र प्रत्यक्ष प्रकल्पाचे निरीक्षण होताना जगातील एकही पत्रकार निरीक्षण पथकासोबत असणार नाही, ही अट घातली. या अटीच्या मान्यतेनंतरच व्हिएन्नास्थित आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संस्थेची निरीक्षणाची मागणी रशियन सरकारकडून मान्य करण्यात आली. मागच्या गुरुवारीच चौदा सदस्यीय निरीक्षकांनी झोपोरिशिआ येथील अणुउर्जा प्रकल्पास भेट दिली. या निरीक्षकांमध्ये अमेरिका आणि इंग्लंडचा कुणीही निरीक्षक समाविष्ट नव्हता. ही पूर्वअटसुद्धा पुतीन यांची

## ।। अभंगवाणी ।।



स्मशान ते भूमि प्रेतरूप जन ।
सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१॥
भरतील पोट श्वानाचिया परी ।
वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचं निधन



।मुंबई। महाईन्यूज।

ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ द्वितीय यांचं वयाच्या ९६ वर्षी निधन झालं. बंकिंगहम पॅलेसने याबाबत अधिकृतपणे माहिती दिली आहे. त्यांनी स्कॉटलंडमध्ये गुरुवारी (८ सप्टेंबर) अखेरचा श्वास घेतला. मागील बऱ्याच काळापासून त्यांची प्रकृती खराब होती आणि त्यांच्यावर वैद्यकीय उपचारही सुरू होते. मागील ७० वर्षांपासून त्या ब्रिटनच्या महाराणी पदावर होत्या. १९५२ मध्ये त्या पदावर आल्या होत्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "२०१५ आणि २०१८ मध्ये झालेल्या ब्रिटनच्या माझ्या दौऱ्यात महाराणी एलिझाबेथ द्वितीय यांच्या भेटीच्या आठवणी अविस्मरणीय आहेत. मी त्यांचा दयाळूपणा कधीही विसरू शकणार नाही.

# महाराष्ट्रातील गावं जोडण्यासाठी लहान पूल उभारण्याची योजना निर्माण करणे गरजेचे–चव्हाण!

## ग्रामीण भागातील दळणवळणाची व्यवस्था बळकट होण्याच्या दृष्टीने अधिक मदत

।मुंबई।महाईन्यूज।

राज्यातील ग्रामीण भागांमध्ये सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमधील प्रत्येक गाव एकमेकांना जोडण्याच्यादृष्टीने गावांगावांध्ये साकव (लहान पूल) उभारण्याची योजना निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दळणवळणाची व्यवस्था बळकट होण्याच्या दृष्टीने अधिक मदत होईल. सध्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सुमारे ५०० ते ६०० पूल उभारणीसाठी सुमारे ५० लाख ते ५ कोटीपर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. त्यादृष्टीने केंद्र सरकारने एक व्यापक योजना तयार करुन आर्थिक



मदत देण्याची मागणी महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज(बुधवार) केली. यावेळी व्यासपिठावर उपस्थित केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, नितीन गडकरी यांनी यांसदर्भात प्रस्ताव तयार करण्याची सूचनाही याप्रसंगी केली.

बंगळुरू येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मंथन – आयडिया टू ॲक्शन' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.

### हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण

सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण यांनी सांगितले की, "ज्या महाराष्ट्राचे आपण प्रतिनिधीत्व करतो, त्या महाराष्ट्रात आमचे मार्गदर्शक नितिन गडकरी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून त्यांच्या एतिहासिक कामगिरीने महाराष्ट्राचे नाव संपूर्ण देशात लोकप्रिय केले आहे. आम्ही गडकरी यांच्या नेतृत्वाखाली एक छोटासा कार्यकता म्हणून काम करण्यास सुरुवात केली व आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रीपदाची जबाबदारी आपल्याला मिळाली, हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे."

### सुमारे दोन लाख कोटी निधीची आवश्यकता

याप्रसंगी बोलताना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण यांनी सांगितले की, "महाराष्ट्रात सुमारे ३ लाख कि.मी.चे रस्ते आहेत. गडकरींच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील जे काही रस्ते जे राज्य महामार्ग होते, ते राष्ट्रीय महामार्गामध्ये परावर्तित झाल्यामुळे आमच्यावरील जबाबदारी काही प्रमाणात कमी झाली आहे. परंतु आता बाकीची जबाबदारी पूर्ण करावयाची असल्यास सध्या महाराष्ट्रात जे ९६ हजार कि.मी.चे रस्ते आहेत, ते रस्ते परिपूर्ण करण्याची आवश्यकता असून त्यांच्या बांधणीसाठी आम्हाला सुमारे २ लाख कोटी निधीची आवश्यकता आहे. परंतु इतका प्रचंड निधी राज्याच्या अर्थसंकल्पातून उभा करणे कठीण आहे, त्यासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीची अधिक गरज असून केंद्र सरकारने त्यादृष्टीने महाराष्ट्राला सहकार्य करावे.

### एक प्रभावी योजना तयार करण्याची गरज -

"महाराष्ट्रातील विविध भागात ज्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अपघात होतात ते भाग ब्लॅक स्पॉट्स म्हणून ओळखले जातात. हे ब्लॅक स्पॉट दुरुस्त करुन त्यादृष्टीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे.काही रस्त्यांना धोकादायक वळणे आहेत, तर काही रस्ते वाहतुकीच्यादृष्टीने अतिशय अरुंद आहेत असे ब्लॅक स्पॉटस सुधारण्याच्या दृष्टीने व रस्ते अपघात रोखण्याच्यादृष्टीने केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने एक प्रभावी योजना तयार करण्याची गरज आहे.

# पावसाचा तडाखा ; मुंबई, ठाण्यात वाहतूक मंदावली!

## नोकरदारांचे हाल; गणेशभक्तांच्या उत्साहावर विरजण

।मुंबई।महाईन्यूज।

**मुंबई, ठाणे, पुणे : मध्य आणि दक्षिण भारतासह महाराष्ट्रात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून, बुधवारी सायंकाळी मुंबई, ठाण्याला पावसाने तडाखा दिला. त्यामुळे रस्ते वाहतूक मंदावली आणि कामावरून घरी परतणाऱ्या नोकरदारांचे हाल झाले.**



गेल्या आठवड्यात मुंबई, ठाण्यासह राज्यातील बहुतांश भागांत दिवसाच्या कमाल तापमानात मोठी वाढ झाली होती. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून पुन्हा राज्यात सर्वत्र पावसाळी वातावरण निर्माण झाले.

मुंबई शहर आणि उपनगरांत बुधवारी दिवसभर विश्रांती घेतलेल्या पावसाने सायंकाळच्या सुमारास जोर धरला. विजांच्या कडकडाटात मुसळधार पाऊस पडल्याने घरी परतणाऱ्या नोकरदारांची तारांबळ उडाली. बुधवारी सायंकाळी पाच ते सहा वाजेपर्यंत मुंबई शहरातील सी वॉर्डमध्ये १८ मिमी, मलबार हिल येथे १७ मिमी पावसाची नोंद झाली. पूर्व उपनगरात मुलुंड येथे २८ मिमी, एस वॉर्डमध्ये २७ मिमी पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे गणेश दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांचा हिरमोड झाला. ठाणे जिल्ह्यालाही पावसाने झोडपले.

ठाणे शहरात २० ते २५ मिनिटांत सुमारे ३२ मिमी पावसाची नोंद झाली. शहरात पातलीपाडा, खारेगाव आणि कोपरी या तीन ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. गोखले रोड, नौपाडा यासारख्या महत्त्वाच्या रस्त्यांवर साचले होते. त्यामुळे वाहतुकीस अडथळा होऊन जनजीवन विस्कळीत झाले. कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूरलाही पावसाने तडाखा दिला

हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्याच्या विविध भागांत पुढील पाच ते सहा दिवस कमी-अधिक प्रमाणात पाऊस सक्रिय राहणार आहे.

अनंत चतुर्दशीच्या दिवसापासून म्हणजेच ९ सप्टेंबरपासून कोकण, पश्चिम-उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. ९ ते ११ सप्टेंबर या कालावधीत पावसाचा जोर वाढणार आहे. ९ सप्टेंबरला कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह काही भागांत मुसळधारांची शक्यता आहे.

### दक्षिणेत हाहाकार..

महाराष्ट्रासह सध्या दक्षिणेकडील कर्नाटक, केरळ आदी राज्यांत जोरदार पाऊस सुरू आहे. बेंगळुरू येथील पाऊसहालाची चित्रे गेल्या काही दिवसांपासून देशभर गाजत आहेत. तेथे आणखी जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### अतिवृष्टीची भीती..

पुढील पाच दिवस राज्याच्या अनेक भागांत पाऊस पडणार असून, अनंत चतुर्दशीच्या दिवसापासून कोकण, पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्र तसेच विदर्भात काही भागांत पावसाचा जोर आणखी वाढण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. कोकण विभागात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.

### पूर्व विदर्भात रौद्र रूप

नागपूर : बुधवारी सायंकाळपासून नागपूरसह पूर्व विदर्भात काही ठिकाणी तब्बल तासभर आकाशात विजांचे तांडव सुरू होते. त्याला पावसानेही साथ दिली. नागपूरसह भंडारा जिल्ह्यात मंगळवारी विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. वर्धा, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

### पाऊसभान..

महाराष्ट्रासह मध्य आणि दक्षिण भारतामध्ये पावसाने काही दिवस विश्रांती घेतली होती. सध्या मोसमी पावसाची आस पुन्हा मूळ जागी म्हणजे मध्य भारतापासून दक्षिण दिशेकडे स्थिरावत आहे. त्यामुळे या भागांत कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होत आहे. ९ सप्टेंबरच्या दरम्यान बंगालच्या उपसागरामध्ये चक्रीय वाऱ्यांच्या स्थितीमुळे दक्षिणेकडे कमी दाबाचे क्षेत्र तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही पावसाचा जोर वाढू शकतो. अनंत चतुर्दशीपासून राज्याच्या काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत ९ ते ११ सप्टेंबर या कालावधीत जोरदार पावसाचा अंदाज आहे. याच कालावधीत रायगड, रत्नागिरीत काही भागांत अतिवृष्टीची शक्यता आहे.

# याकूबच्या कबरीच्या मुद्द्यावरून राजकीय पोळी भाजण्याचा भाजपाचा डाव : अतुल लोंढे

## धार्मिक वातावरण बिघडवण्याचे काम करत आहे भाजपा

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



भारतीय जनता पक्षाकडे देशातील मुख्य प्रश्नांवर उत्तर नसल्याने जाणीवपूर्वक धार्मिक मुद्द्यांना महत्व दिले जात आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर दहशतवादी याकूब मेमनच्या कबरीचा मुद्दा उपस्थित करून भाजपा धार्मिक वातावरण बिघडवण्याचे काम करत आहेत. (परंतु २०१५ साली दहशतवादी याकूब मेमनचा मृतदेह भाजपा सरकारनेच त्यांच्या कुटुंबियांना दिला व त्याचा अत्यंसंस्कार झाल्याचे सर्वांनी पाहिले. अतिरेक्याचा मृतदेह भाजपाने त्यांच्या कुटुंबियांना का दिला? याचे उत्तर भाजपाने द्यावे, अशी विचारणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, कोणत्याही दहशतवाद्याचा मृतदेह कुटुंबीयांना देता येत नाही. काँग्रेस सरकारने दहशतवादी अफजल गुरू आणि मुंबई हल्ल्यातील दहशतवादी अजमल कसाबला फाशी दिल्यानंतर त्यांना अज्ञातस्थळी दफन केले. अतिरेक्यांचे समाजात उदात्तीकरण होऊ नये म्हणून काँग्रेसने खबरदारी घेतली होती. भाजपाच्या सरकारने मात्र २०१५ साली दहशतवादी याकूब मेमनचा मृतदेह त्याच्या कुटुंबियांना दिला.

**मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर दहशतवादी याकूब मेमनच्या कबरीचा मुद्दा उपस्थित करून भाजपा धार्मिक वातावरण बिघडवण्याचे काम करत आहेत. (परंतु २०१५ साली दहशतवादी याकूब मेमनचा मृतदेह भाजपा सरकारनेच त्यांच्या कुटुंबियांना दिला व त्याचा अत्यंसंस्कार झाल्याचे सर्वांनी पाहिले. अतिरेक्याचा मृतदेह भाजपाने त्यांच्या कुटुंबियांना का दिला? याचे उत्तर भाजपाने द्यावे, अशी विचारणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.**

भाजपाचे खासदार शत्रुघ्न सिन्हा व वरूण गांधी यांनी याकूब मेमनला फाशी देऊ नये म्हणून पत्रही लिहिले होते. यावर भाजपा माफी मागणार का ? तसेच ज्यावेळी मृतदेह दफन केला जातो त्याच्या तीन वर्षांनंतर त्याठिकाणी दफन केलेल्या ठिकाणी नागर वखर करण्यात येते, ती कबर खोदली जाते. मात्र असे झाले नाही. कोणाच्या आशीर्वादाने हे झाले आहे याचे उत्तर भाजपने द्यावे.

भाजपा सरकारने मात्र कुख्यात दहशतवादी मसूद अजहर याला सरकारी सुरक्षेत अफगाणिस्तानात सोडून देण्यात आले होते. संसदेवर हल्लाही भाजपा सरकारच्या काळात झाला होता. पठाणकोट हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या ISI या गुप्तहेर संघटनेला भारतात तपासासाठी येण्याचे निमंत्रण भाजपा सरकारनेच दिले होते. भाजपाने दहशवादाबद्दल बोलणे हेच मुळात हास्यास्पद आहे, असेही लोंढे म्हणाले.

## शॉर्ट न्यूज »

### खेला होबे’! भाजपच्या पराभवाची सुरुवात



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजपच्या पराभवाची सुरुवात 2024 मध्ये बंगालमधून होणार असल्याचं मोठं वक्तव्य पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केलं आहे. आम्ही सर्व एकत्र आहोत, आता अखिलेश यादव, नितीशकुमार, हेमंत सोरेन हे सगळे एकत्र आले आहेत. ज्यांना 275-300 जागांचा अभिमान आहे त्यांनी लक्षात ठेवावे की, राजीव गांधी यांच्याकडे 400 जागा होत्या. त्यांना सांभाळताही येत नव्हते. जे 300 बद्दल बोलत आहेत त्यांना या 5 राज्यांमध्ये 100 जागांचा झटका बसणार आहे, असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. 2024 मध्ये भाजपला सत्तेतून बाहेर काढण्यासाठी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिल्लीतील सर्व पक्षांच्या नेत्यांशीही चर्चा केली आहे.

# देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज करणार ‘कर्तव्य पथ’चे उद्घाटन!

## नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पुतळ्याचंही अनावरण

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सेंट्रल विस्टा प्रकल्पाचे उद्घाटन करणार आहेत. राजधानी दिल्लीत आज शानदार कार्यक्रम पार पडणार आहे. नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पुतळ्याचंही अनावरण यावेळी करण्यात येणार आहे. राजपथच नाव कर्तव्यपथ केले जाणार आहे. इंडिया गेट आणि कर्तव्यपथ पुन्हा एकदा सर्वसामान्य जनतेसाठी खुला होणार आहे. तब्बल 20 हजार कोटींच्या या भव्य प्रकल्पाचे उद्घाटन आज केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सायंकाळी 7 वाजता ‘कर्तव्य पथ’चे उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान मोदी यावेळी इंडिया गेट येथील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण करणार आहेत. NDMC ने गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडून ठराव मंजूर करून ‘राजपथ’ चे नाव बदलून ‘कर्तव्य पथ’ केले आहे. आता इंडिया गेटवरील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यापासून ते राष्ट्रपती भवनापर्यंतच्या संपूर्ण परिसराला ‘कर्तव्यपथ’ असे म्हटले जाणार आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान करणार आहेत. हा ग्रॅनाईटचा पुतळा नेताजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदानासाठी श्रद्धांजली आहे असं मोदी म्हणाले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा अरुण योगीराज यांनी तयार केला आहे, जे या वास्तूचे मुख्य शिल्पकार आहेत. 28 फूट उंच पुतळा एका मोनोलिथिक ग्रॅनाइट दगडात कोरलेला आहे आणि त्याचे वजन 65 मेट्रिक टन आहे.

### कर्तव्य पथ

- कर्तव्य पथ सुमारे 3 किलोमीटरचा रस्ता आहे.
- 4 हजार 087 झाडे आहेत. 114 आधुनिक बोर्ड आहेत.
- 900 हून अधिक दिवे बसवले आहेत.
- 8 फीचर ब्लॉक्स तयार करण्यात आले आहेत. त्याचे क्षेत्रफळ 1,10,457 चौरस मीटर आहे.
- कॉंक्रीटचे 987 जाडीचे खांब आहेत.
- 1 हजार 490 मॅनहोल करण्यात आले आहेत.
- 4 पादचारी अंडरपास करण्यात आले आहेत.
- लाल ग्रॅनाइटचे 422 बेंच आहेत.
- NDMC ने बुधवारी राजपथचे नामकरण ड्युटी पाथ असे करण्यास मान्यता दिली आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कर्तव्य पथ राष्ट्राला समर्पित करणार आहेत.
- कर्तव्यपथावर 6 नवीन वाहनतळ बांधण्यात आले आहेत.
- 6 वेंडिंग झोन करण्यात आले आहेत.
- 1 हजार 580 लाल-पांढऱ्या सॅंडस्टोनचे बोलार्ड बनवले आहेत.
- कचरा टाकण्यासाठी 150 डस्टबीन बसवण्यात आले असून या ड्युटी

### पंतप्रधानांच्या आजच्या कार्यक्रमाची माहिती

- सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण करतील.
- सेंट्रल व्हिस्टा पुनर्बांधणीची पाहणी करतील.
- सेंट्रल व्हिस्टा येथील कामगारांची संध्याकाळी 7 वाजता भेट घेणार.
- पंतप्रधान सेंट्रल व्हिस्टाचे उद्घाटन संध्याकाळी 7.30 वाजता करणार.
- पंतप्रधान मंचावर पोहोचतील, नगरविकास मंत्री हरदीप पुरी स्वागतपर भाषण संध्याकाळी 7.40 वाजता करणार.
- नेताजी सुभाषचंद्र बोस पुतळ्याच्या बांधकामाचा टाइमलॅप व्हिडिओ दाखवला जाईल.
- सुधारित अर्जानुसारच मतदारांनी मतदार यादीतील बदल करावेत.

# कोळी समाजाबद्दल मला आदर... वर्षा उसगावकरांनी मागितली माफी

मराठीतील ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांना सध्या कोळी भगिनींच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. याचे कारण म्हणजे मागील काही दिवसांपूर्वी वर्षा उसगावकर यांनी एका जाहिरातीत काम केले असून, यामध्ये "बाजारात बऱ्याच वेळा कोळणींकडून माझी फसवणूक झाली आहे. बाजारातल्या पापलेटला इतका घाणेरडा वास येतो की, त्यावेळी मी हे पापलेट का घेतले, असे वाटून निराश झाले", असे वादग्रस्त विधान वर्षा उसगावकर यांनी त्या जाहिरातीमधून केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर मच्छिमारांनी संताप व्यक्त केला आहे, ज्या ऑनलाइन ॲपने ही जाहिरात प्रदर्शित केली आहे त्यांनी कोळी महिलांची माफी मागावी अन्यथा त्यांना कायदेशीर नोटीस बजावली जाईल, अशी भुमिका मच्छिमारांनी घेतली होती. दरम्यान, अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी त्यांच्या फेसबुक अकाउंटवर या संदर्भात एक व्हिडीओ शेअर करत कोळी समाजाची माफी मागितलेली आहे. त्यावेळी त्या म्हणाल्या की, ऑनलाईन कंपनीकडून बनवण्यात आलेल्या जाहिराती



मुळे अनावधानाने कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी त्यांची माफी मागते. माझ्या मनात त्यांच्या भावना दुखावण्याचा हेतू नव्हता. मला कोळी समाजाचा आदर आहे. त्यामुळे मी पुन्हा एकदा हात जोडून माफी मागते. अशा शब्दांत वर्षा उसगावकर यांनी कोळी समाजाची माफी मागितली आहे."

# अभिनेता अजय देवगण चित्रगुप्ताच्या भूमिकेत?



बॉलिवूडचा सिंघम म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे अजय देवगण. गेली अनेकवर्ष सातत्याने तो आपल्याला वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसत आहे. 'सिंघम' मधला कर्तव्यदक्ष अधिकारी असो, 'तान्हाजीमधला' मर्द मावळा किंवा 'दृश्यम' चित्रपटातील कुटुंबाला सांभाळणारा पिता असो, अजय देवगणने कायमच आपल्या अभिनयनातून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. अजय देवगण सोशल मीडियावर देखील सक्रिय असतो. नुकतेच त्याचे 'आर आर आर' आणि 'रनवे ३४' चित्रपट प्रदर्शित झाले होते.

अजय देवगण यांनी आपल्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आणली आहे ती म्हणजे अजय देवगणच्या आगामी 'थँक गॉड' या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. अजय देवगण याने आपल्या ट्विटर अकाऊंटवरून ही माहिती दिली आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत सिद्धार्थ मल्होत्रा आणि रकुल प्रीत सिंग देखील रुपेरी पडद्यावर दिसणार आहेत. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये अजय देवगण सिंहासनावर बसलेला दिसत आहे. काळ्या रंगाच्या सूटमध्ये अजय देवगण शोभून दिसत आहे. सुरु आहे. अजय देवगणनेही ट्विट करून चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चची तारीख दिली आहे. या चित्रपटाचा ट्रेलर उद्या म्हणजेच शुक्रवारी प्रदर्शित होणार आहे.

# ऐश्वर्या रायवर त्रिशा कृष्णन पडली भारी

प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांच्या 'पोन्नियन सेल्वन' चित्रपट मागच्या बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. या चित्रपटात बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनची मुख्य भूमिका असून नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेत्री त्रिशा कृष्णनही महत्वपूर्ण भूमिकेत आहे. या चित्रपटात ऐश्वर्याची जरी मुख्य भूमिका साकारत तरी 'पोन्नियन सेल्वन' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चच्या वेळी मात्र वेगळे चित्र दिसले. 'पोन्नियन सेल्वन'च्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटमध्ये ऐश्वर्यापेक्षा अभिनेत्री त्रिशा कृष्णन हिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या रायच्या सौंदर्यावर करोडो लोक फिदा आहेत. ऐश्वर्या तिच्या सौंदर्याने सर्वांना खिळवून ठेवते. 'पोन्नियन सेल्वन' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटला ऐश्वर्या आणि त्रिशा कृष्णन दोघीही हजर होत्या. अशात दोघींना पाहून सोशल मीडियावर प्रेक्षक त्यांची तुलना लागले आणि यात तृषा भाव खाऊन गेली. या कार्यक्रमदारम्यान त्रिशाने गुलाबी रंगाची साडी नेसली होती. या साडीत ती फार सुंदर दिसत होती. तर ऐश्वर्याने काळ्या रंगाचा ड्रेस आणि त्याच रंगाची ओढणी घेतली होती. त्रिशाच्या लुकला नेटकऱ्यांनी अधिक पसंती दिली. तिच्यापुढे ऐश्वर्या रायचा लुक एकदम फिका ठरला. 'पोन्नियन सेल्वन'च्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटसाठी ऐश्वर्याने निवडलेल्या या आऊटफिटवर नेटकऱ्यांनी टीका केली. ऐश्वर्याचा लुक पाहून अनेकांनी तिला ट्रोल केलं.





# 'पल्याड'चे मोशन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीस

**4 नोव्हेंबरला 'पल्याड' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. स्मशानजोगी समाजातल्या परिवाराची गोष्ट सांगणाऱ्या 'पल्याड'चं मोशन पोस्टर सर्वार्थानं चित्रपटाची झलक दाखवणारं आहे**




मागील बऱ्याच दिवसांपासून अनेक चित्रपट महोत्सवात पुरस्कार पटकावल्याने चर्चेत आलेला 'पल्याड' हा मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं कथानक, समाजाचं वास्तव दाखवणारा ज्वलंत आशय, कसलेल्या कलाकारांचा लक्षवेधी अभिनय आणि विषयाचं गांभीर्य मनावर ठसवणारं कल्पक दिग्दर्शन या आणि अशा बऱ्याच कारणांमुळे 'पल्याड'बाबत उत्सुकता वाढली आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरने 'पल्याड' बाबतची उत्सुकता आणखी वाढवण्याचं काम केलं आहे. प्रदर्शित झाल्यापासून वाऱ्याच्या वेगानं मोशन पोस्टर जनमानसापर्यंत पोहोचत आहे. निर्माते पवन सादमवार, सुरज सादमवार, मंगेश दुपारे, प्रणोती पांचाळ आणि शैलेश भीमराव दुपारे यांनी एलिवेट फिल्म्स आणि लावण्यप्रिया आर्टसच्या बॅनरखाली 'पल्याड'ची निर्मिती केली आहे. दिग्दर्शक शैलेश भीमराव दुपारे यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून के सेरा सेरा या डीस्ट्रीब्युशनच्या माध्यमातून येत्या 4 नोव्हेंबरला 'पल्याड' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. स्मशानजोगी समाजातल्या परिवाराची गोष्ट सांगणाऱ्या 'पल्याड'चं मोशन पोस्टर सर्वार्थानं चित्रपटाची झलक दाखवणारं आहे. हा चित्रपट सत्य प्रथा आणि परंपरेवर आधारीत आहे. आगीचा आगडोंब, जीवाच्या आकांतानं पळणारे माय-लेक, हातात काठ्या घेऊन त्यांच्या मागे धावणारा जनसमुदाय, पुस्तकासोबत विठ्ठल-रुक्मिणीचा फोटा आणि विठ्ठल-विठ्ठल हे वाजणारं गाणं असं चित्र 'पल्याड'च्या मोशन पोस्टरमध्ये पाहायला मिळतं.

# 'पुष्पा २'मध्ये लागली 'या' लोकप्रिय अभिनेत्रीची वर्णी

'पुष्पा २'मध्ये लागली 'या' लोकप्रिय अभिनेत्रीची वर्णी, पहिल्यांदाच दिसणार रश्मिका मंदाना आणि अल्लू अर्जुनबरोबरदाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुनचा 'पुष्पा: द राइज' चित्रपट तुफान गाजला आणि अल्लू अर्जुन फक्त दाक्षिणात्य प्रेक्षकांमध्येच नाही तर हिंदी भाषिक प्रेक्षकांमध्येही लोकप्रिय ठरला. या चित्रपटातील अल्लू अर्जुनचा रावडी अंदाज सर्वांच्याच पसंतीस उतरल्याचं पाहायला मिळालं. पुष्पाच्या प्रचंड यशानंतर काही दिवसांपूर्वीच निर्मात्यांनी या चित्रपटाच्या पुढील भागाची घोषणा केली. आता चित्रपटाबद्दल मोठी बातमी समोर आली आहे. एका लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेत्रीची या चित्रपटात वर्णी लागली आहे.



## शॉर्ट न्यूज »

### तीन वर्षांत भारताला जगज्जेता बुद्धिबळपटू मिळण्याची शक्यता!

कोलकाता। महाईन्यूज

भारतामध्ये प्रतिभावान बुद्धिबळपटूंची संख्या मोठी असली, तरी आपल्याला पुढील जगज्जेता मिळण्यासाठी २०२५ सालापर्यंतचा कालावधी लागेल, असे मत दिग्गज बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने व्यक्त केले.

"तुम्ही जर विश्वविजेतेपदाच्या किताबाची चर्चा करत असाल, तर आपल्याला २०२५ सालापर्यंत पुढील जगज्जेता मिळू शकेल, त्यापूर्वी नाही. विश्वविजेतेपदापर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही सोपा आणि वेगवान मार्ग उपलब्ध नाही. आपल्याला तयारीसाठी बराच वेळ मिळेल, पण बऱ्याच छोटय़ा-छोटय़ा गोष्टींचा बारकाईने विचार करावा लागेल," असे आनंद म्हणाला. विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनने पुढील वर्षीच्या जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीतून माघार घेतल्याने ही लढत आता आव्हानवीर स्पर्धेतील विजेता ग्रँडमास्टर इयान नेपोम्निशी आणि उपविजेता ग्रँडमास्टर डिंग लिरेन यांच्यात होणार आहे. त्यामुळे डी. गुकेश, आर प्रज्ञानंद आणि अर्जुन इरिगेसी या युवा भारतीय बुद्धिबळपटूंना जगज्जेतेपदासाठी आव्हान देण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागेल.

# विजयापेक्षा विराटचे शतक मोठे! अफगाणिस्तानचा लाजीरवाणा पराभव!

## कोहलीच्या फलंदाजीमुळे भारतीय सुखावले

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

यूएईमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक स्पर्धेत आज (८ सप्टेंबर) भारत-अफगाणिस्तान यांच्यात लढत झाली. या दोन्ही संघांचे आव्हा अगोदरच संपुष्टात आलेल्यामुळे आजचा सामना औपचारिक होता. एकीकडे विराट कोहलीने शतकी खेळी करत हा सामना संस्मरणीय ठवरला. तर दुसरीकडे ज्या अफगाणिस्तानने पाकिस्तानला शेवटच्या चेंडूपर्यंत झुंजवलं त्या अफगाणिस्तानवर भारताने आरामात विजय मिळवला. मात्र पाकिस्तानविरोधातील सामन्यात पराभव आणि अंतिम सामन्यात पोचण्यात आलेले अपयश यामुळे क्रीडा रसिकांमध्ये अनुत्साह दिसला. भारताने अफगाणिस्तानसमोर विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. अफगाणिस्तान संघाला मात्र फक्त १११ धावा करता आल्या. आजच्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. भारताने विजयासाठी दिलेल्या १२३ धावांचे



लक्ष्य गाठण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानच्या संघाची त्रेधातिरपिट उडाली. अफगाणिस्तानचे सलामीचे दोन्ही फलंदाज हजरतुल्ला झाझाई, रहमानउल्ला गुरबाज शून्यावर बाद झाले. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या इब्राहिन झरदानने चांगला खेळ केला. त्याने ५९ चेंडूंमध्ये ६२ धावा केल्या. झरदान वगळता अफगाणिस्तानचा कोणताही खेळाडू २० पेक्षा जास्त धावा करू शकला नाही.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंत आजच्या सामन्यात रोहित शर्मा नसल्यामुळे केएल राहुल आणि विराट कोहली सलामीला आले. विराट कोहली संपूर्ण २० षटके होईपर्यंत मैदानावर टीकू होता. त्याने ६१ चेंडूंमध्ये १२ चौकार आणि ६ षटकार लगावत १२२ धावांची नाबाद खेळी केली. तर केएल राहुलनेही ४१ चेंडूंमध्ये ६ चौकार आणि २ षटकार लगावत ६२ धावा केल्या. पुढे सूर्यकुमार यादव सहा धावा करून स्वस्तात बाद झाला. तर ऋषभ पंतही २० धावांवर नाबाद राहिला. गोलंदाजी विभागात आज भारतीय संघानेही तेवढीच दिमाखदार कामगिरी किली. वेगवान गोलंदाज सूर्यकुमार यादवने चार षटकांत अवघ्याच चार धावा देत तब्बल ५ बळी घेतले.


### अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा

# खाचानोवने किरियॉसचा झंझावात रोखला!

।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।

वेगवान सर्व्हिसवर खेळल्या गेलेल्या लढतीत २७व्या मानांकित कॅरीन खाचानोवने ऑस्ट्रेलियाच्या निक किरियॉसचा झंझावात रोखला. याचप्रमाणे महिला विभागात टय़ुनिशियाची ओन्स जाबेऊर आणि फ्रान्सची कॅरोलिना गार्सिया यांनी आक्रमक खेळ करत सरळ सेटमध्ये विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. नॉर्वेच्या पाचव्या मानांकित कॅस्पर रूडनेही उपांत्य फेरी गाठली. एकूणच नामांकितांच्या पराभवांमुळे यावेळी नव्या चेहऱ्यांनी अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. जाबेऊरने ऑस्ट्रेलियाच्या अजला टॉमयानोविचचा ६-४, ७-६ (७-४) असा पराभव केला. गार्सियाने अमेरिकेच्या १८ वर्षीय कोको गॉफला ६-३, ६-४ असे नमवले. पुरुष एकेरीत रूडने बेरेट्टिनीचे आव्हान ६-१, ६-४, ७-६(७-४) असे परतवून लावले. खाचानोवने पाच सेटच्या संघर्षांनंतर ऑस्ट्रेलियाच्या किरियॉसचा ७-५, ४-६, ७-५, ६-७ (३-७), ६-४ असा पराभव केला. यंदा विम्बल्डनच्या अंतिम फेरीत धडक मारली, तेव्हा सर्वप्रथम जाबेऊर

### नव्या चेहऱ्यांची उपांत्य फेरीत धडक



टेनिस विश्वात प्रकर्षांने झळकली. आता तेच सातत्य कायम राखताना जाबेऊरने अमेरिकन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत तिची गाठ नवोदित गार्सियाशी पडेल. पहिला सेट सहज जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटला अनेकदा जाबेऊरची सर्व्हिस भेदण्यात टॉमयानोविचला यश आले. यामुळे जाबेऊर निराश झाली होती. अनेकदा जाबेऊरने रॅकेट कोर्टवर आपटली. याच निराशेवर मात करत जाबेऊरने टायब्रेकरमध्ये कमालीच्या संयमाने विजय निसटणार नाही याची काळजी घेतली.

स्पर्धेपूर्वी सिनसिनाटी स्पर्धेचे विजेतेपद आणि तेव्हापासून एकेरीत सलग १३ विजय मिळवून गार्सिया उपांत्य फेरीपर्यंत पोचली

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
+91 96577 67000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही